## -: निवेदन :-

मी या निवेदनाद्वारे असे जाहीर करतो की, "अठराव्या शतकातील पश्चिम महाराष्ट्रातील नगरे व शहरे" ( Towns and Cities in Western Maharashtra in the 18th Century ) हा प्रबंध माझे संशोधक मार्गदर्शक डॉ.मनोहर लोहार यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वतः लिहला असून सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विषयातील एम.फील. पदवीसाठी विद्यापीठास सादर केला आहे.

स्थळ :- कोल्हापूर.
दिनांक:- ३० नोव्हेंबर, १९९२.

(प्रा. विलास य. मगदूम)
अध्यापक.

## -: प्रमाणपत्र :-

श्री. विजय व्यंकट मगदूम यांनी इतिहास विषयातील एम.फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे सादर करावयाचा "अठराव्या शतकातील पश्चिम महाराष्ट्रातील नगरे व शहरे" ( Towns and Cities in Western Maharashtra in the 18th Century. ) हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे.

श्री. मगदूम यांनी लिहिलेला प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारित आहे.

स्थळ : कोल्हापूर.
दिनांक: नोव्हेंबर, १९९२.

(डॉ. मनोहर लोहार)
संशोधन मार्गदर्शक,
इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर.

-: प्रास्ताविक :- 

१८ व्या शतकातील नगरे व शहरे हा विषय संशोधनासाठी मी निवडला. त्याचे कारण १८ व्या शतकात पश्चिम महाराष्ट्राच्या राजकीय व आर्थिक क्षेत्रात काही बदल झाले होते, व त्यामुळे काही नविन शहरांचा उदय झाला. ही शहरे कशी उदयास आली व तेथील परिस्थिती काय होती हे समजुन घेण्याचा उद्देश होता. त्याचप्रमाणे नविन शहरे उदयास येणे व जुन्या शहराचे महत्व कमी होणे ही प्रक्रिया चालू होती. राजकीय व सामाजिक इतिहासाबरोबरच शहरांच्या अभ्यासामुळे तत्कालीन परिस्थितीवर अधिक प्रकाश टाकता येईल. म्हणून पश्चिम महाराष्ट्रातील १८ व्या शतकातील शहरांचा अभ्यास या प्रबंधात करण्यात आला आहे.

"टाऊन" व "सिटी" या इंग्रजी शब्दांचे "शहरे" या ग्रंथात पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

"इंग्रजी भाषेतही "Towns " व " Cities " हे शब्द कांही वेळा समानार्थी वापरले जातात, व कांही वेळा " Towns " हे लहान व " City " हे मोठे वसतिस्थळ या अर्थाने त्यांचा उपयोग होतो.

"शहर" हा शब्द दोन अर्थी वापरलेला आहे. १) ५००० ते १,००,००० लोकसंख्या असलेल्या वस्तीसमूहास अनुलक्षुन. २) सर्व प्रकारच्या नागरी वस्तीसमुहांना सर्वसाधारण निर्देश करतांना हा शब्द प्रचारात असल्याने तो वापरण्यास सोपा वाटतो. "नगर" याचा अर्थ लोकसंख्या १,००,००० ते १०,००,००० लोकसंख्या असलेल्या वस्तीसमुहासाठी योजिण्याचा शक्य तितका प्रयत्न केला आहे." (चं.भु.देशपांडे, शहरे - भौगोलिक अभ्यास-कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९८० पृ.१२,१३).

वरील स्पष्टीकरणावरून "टाऊन" या इंग्रजी शब्दासाठी "शहर" व "सिटी" या शब्दासाठी "नगर" हे शब्द योजल्याचे लक्षात येते. अर्थात लोकसंख्येचे आधुनिक निकष अठराव्या शतकातील शहरांना जसेच्या तसे लावणे योग्य ठरणार नाही. मुंबई व पुणे वगळता इतर शहरांची लोकसंख्या कांही वेळा वरील प्रमाणापेक्षा कमी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे शहर व नगर हे शब्द आधुनिक अर्थाने काटेकोरपणे वापरता येणार नाहीत. तरी देखील अठराव्या शतकात मुंबई व पुणे ही नगरे म्हणजेच मोठी शहरे होती असे म्हणता येईल व इतर स्थळांचा लहान शहरे म्हणून उल्लेख करावा लागेल. बहुतांशी शहरांची जनगणना झाली नसल्याने व त्या शहरांची लोकसंख्या समजणे शक्य नसल्याने "नगर व शहर" हे शब्द या अभ्यासात ढोबळमानाने वापरले आहेत.

इंग्रजी मराठी शब्द कोशात देखील Town व City या शब्दांना मराठीत निश्चित शब्द योजना केली नसल्याचे आढळते. "दि ट्वेन्टिएथ सेंच्युरी इंग्लिश-मराठी डिक्शनरी" (संपादक - प्रो.रानडे) मध्ये "City" या शब्दासाठी "शहर, नगर" असे शब्द योजले आहेत. (खंड १, पृ २३७) व "Town" साठी मराठीत "शहर, नगर, नगरी" इत्यादी शब्द वापरले आहेत. (खंड २, पृ.८५६) तसेच वर उल्लेखिलेल्या "शहरे" या ग्रंथाच्या पारिभाषिक शब्दांच्या सूचीत (पृ.१२७,१२९) "Cities" साठी "शहरे-नगरे" व "Town" साठी "शहर, पुर, पट्टण, नगरी" असे मराठीत शब्द सुचविले आहेत. यावरून "शहर, नगर" हे शब्द मराठीत ढोबळमानाने वापरण्यात येतात हे लक्षात येते.

म्हणूनच प्रस्तुत अभ्यासात अठराव्या शतकातील महाराष्ट्रातील नगरे व शहरे सांगताना मुंबई व पुणे ही तुलनेने इतर शहरांपेक्षा मोठी आकाराची शहरे अथवा नगरे होती. व इतर छोटी शहरे होती असा ढोबळमानाने अर्थ अभिप्रेत आहे. त्याचप्रमाणे काही धार्मिक स्थळांना तत्कालिक समाजात विशेष स्थान असल्याने त्यांचा देखिल या अभ्यासात समावेश करण्यात आला आहे.

हा अभ्यास करण्यासाठी १८ व्या शतकातील कागदपत्रांचा आणि इतर ऐतिहासिक साहित्याचा आधार घेतला आहे. तत्कालिन कागदपत्रामध्ये पेशव्यांच्या रोजनिशी, पेशवे दप्तर, मराठ्यांच्या इतिहासाची साधने, ऐतिहासिक लेखसंग्रह इत्यादी ऐतिहासिक साधन-सामुग्रीचा आधार घेतला आहे. त्याचप्रमाणे बॉंबे प्रेसिडेन्सी गॅझेटियर्स, महाराष्ट्र स्टेट गॅझेटियर्स आणि तत्कालिन इंग्रजी कागदपत्रे, व प्रवाशांचे वृत्तांत इत्यादी साधनांचा उपयोग या प्रबंधात केलेला आहे.

या ग्रंथाची ५ प्रकरणांमध्ये विभागणी केलेली आहे. पहिल्या प्रकरणांत मुंबई शहराचा १८ व्या शतकात कसा विकास झाला, याचा शोध घेतलेला आहे. मुंबईचे व्यापारी महत्त्व कसे वाढले आणि मुंबईस एक आंतरराष्ट्रीय व्यापारी केंद्र कसे प्राप्त झाले, याचा शोध घेतलेला आहे.

दुसऱ्या प्रकरणांत पुणे शहराचा उदय आणि विकास १८ व्या शतकात कसा झाला, याची चर्चा केलेली आहे. पुण्याचे राजकीय, व्यापारी आणि धार्मिक महत्त्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. तिसऱ्या प्रकरणांत वाई व पैठ शहरांच्या १८ व्या शतकांतील

स्वरूपाची चर्चा करण्यात आली आहे. चौथ्या प्रकरणामध्ये सातारा, कोल्हापूर, सोलापूर, पंढरपूर इ. राजकीय व्यापारी व धार्मिक शहरांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. व्यापारी शहरांच्या व्यापाराचे स्वरूप कसे होते, व त्याचप्रमाणे धार्मिक स्थळांचे पेशवेकालिन महत्त्व काय होते, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. शेवटी पाचव्या प्रकरणांत एकूण अभ्यासातून काही निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

शोध प्रबंधाच्या विषयाच्या निवडीपासून ते विद्यापीठाला प्रबंध सादर करेपर्यंत ज्या अनेक संस्था, व्यक्ती यांनी सहकार्य केले, त्यांचे आभार मानणे मी माझे नैतिक कर्तव्य समजतो.

माझे मार्गदर्शक डॉ. लोहार एम्.ए. यांनी विषयाची निवड करण्यापासून ते प्रबंध सादर करेपर्यंत अतिशय सहानुभूतीने, अचूक व योग्य मार्गदर्शन केले. विभाग प्रमुख डॉ. कदम व्ही.एस. व प्रा.बी.आर.कांबळे व डॉ. ए.आर. भोसले यांनी आपला अमुल्य वेळ खर्च करून वरचेवर मार्गदर्शन केले. तसेच इतिहास विभागातील सर्व प्राध्यापकांनी प्रेमाची व सहानुभूतीची वागणूक देऊन वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

हा शोध प्रबंध पूर्ण करण्याच्या कामी शिवाजी विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सहाय्यक ग्रंथपालिका सौ. सुमित्रा जाधव व सेवक वर्गाने मोलाचे सहकार्य केले. त्याचप्रमाणे करवीर नगर वाचन मंदिराच्या ग्रंथपाल सौ. वासंती लिमये यांचे उत्तम सहकार्य मिळाले. तसेच पुराभिलेखागार

मधील सर्व सहकारी मित्रांनी दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध करुन दिले. न्यू कॉलेज, कोल्हापूर येथील ग्रंथपाल, श्री.पी.सी.पाटील यांचेही सहकार्य मिळाले. वरील सर्वांच्या सहकार्यानेच मी माझा शोध प्रबंध पूर्ण करु शकलो, त्यामुळे वरील सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानतो.

कापशी कॉलेजचे प्राचार्य श्री. व्ही.ए.रानडे, व सर्व प्राध्यापक वर्ग व सेवक वर्ग यांचे चांगले सहकार्य लाभले. माझे गुरुवर्य डॉ. मोरे सर यांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले. त्याचप्रमाणे मा. आनंदराव खाडे यांनी मला संशोधन कार्यात मौलिक सहकार्य दिले. माझे माता, पिता, बंधू, पत्नी सौ.लता, यांनी प्रापंचिक ओढाताण सहन करुन शोध प्रबंधासाठी सहाय्य केले. माझे स्नेही श्री. निशिकांत पर्लेगे, रवि पाटील, विश्वास पाटील, विलास राबाडे, चंद्रकांत पाटील, प्रा.व्ही.एस.पाटील, वसंत दिंडे, बाबा खासनीस, विद्या साळोखे यांनी वेळोवेळी मदतीचा हात दिला. सौ. माधवी भालकर यांनी अतिशय कमी वेळात टंकलेखन करुन व्यवस्थितरित्या पूर्ण केले. त्यामुळे या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

ज्यांनी प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरित्या मला या कामी सहकार्य केले, त्याबद्दल त्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहे.

प्रा. विलास यशवंत मगदूम,
अभ्यासक.

# -: अनुक्रमणिका :-


| अ.क्र. | तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक. | |
| २. | प्रकरण पहिले – मुंबई. | ६-४३ |
| ३. | प्रकरण दुसरे – पुणे. | ४४-८२ |
| ४. | प्रकरण तिसरे – वसई व चौल. | ८३-१२० |
| ५. | प्रकरण चौथे – इतर काही राजकीय, व्यापारी आणि धार्मिक केंद्रे. | १२१-१५२ |
| ६. | प्रकरण पाचवे – उपसंहार. | १५३-१८० |
| ७. | संदर्भ ग्रंथसूची. | १८१-१८८ |